**संच : अ**

# शिक्षकांसाठी सूचना चौथी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

### इयत्ता - चौथी

### विषय : मराठी

### लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**एकूण गुण : ३०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) भाकर | २) दर्शन |
| ३) शिकारी | ४) रात्र |
| ५) दुपार | ६) नक्कल |
| ७) फैलाव | ८) झेंडा |
| ९) पोस्ट | १०) कॉलर |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'फैलाव' ऐवजी 'फइलाव' किंवा 'शिकारी' ऐवजी 'शीकारी'/ शीकारि असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न २)** बंडूने साऱ्या होड्या नदीकाठी मोठ्या टोपलीत घालून नेल्या. (गुण १)

**प्रश्न ३) क)** अकरा (गुण २)

**प्रश्न ४)** अ) रात्रीच्या वेळी (गुण २)

ब) चांदण्याच्या प्रकाशात त्या बारा होड्यांचा ताफा नदीतून जाताना मस्त दिसत होता.



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 4/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

# संच : अ

**प्रश्न ५ ते ७) खालील जाहिरात वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न ५)** ‘चौकस’ विद्यार्थी संघ (गुण १)

**प्रश्न ६)** ५ दिवस (गुण २)

**प्रश्न ७)** ना नफा ना तोटा (गुण २)

**प्रश्न ८ ते १२) शब्दसंपत्ती आणि व्याकरणावर आधारित प्रश्न.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न ८)** आज शाळेत स्नेहसंमेलन असल्यामुळे सर्व मुले खुशीत होती. (गुण १)

**प्रश्न ९)** नारळाचे झाड बुटके नसते. (गुण १)

**प्रश्न १०)** जोराचा वारा सुटला आणि ढगांचा गडगडाट ऐकू येऊ लागला. (गुण १)

**प्रश्न ११)** समुद्रात जहाजांचा काफिला चालला होता. (गुण १)

**प्रश्न १२)** बाबांनो, आपणच आपले भले केले पाहिजे. (गुण १)

(बाबांनो या शब्दानंतर स्वल्पविराम व पाहिजे या शब्दानंतर पूर्णविराम दिल्यास प्रत्येकी अर्धा याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न १३ ) खालील चित्र पहा आणि त्यावर गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्‌दिष्ट :** मुलांची अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** लेखन नियमांनुसार चुकल्यास गुण कमी करू नये. (प्रमाण भाषेची अपेक्षा करू नये.)

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरित्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दांतील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण चित्राचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले अर्थपूर्ण लेखन. पण गोष्ट असेल असे नाही. |
| ४ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 4/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

**प्रश्न १४) खाली एका गोष्टीची सुरुवात दिली आहे ती गोष्ट पूर्ण कर.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्‌दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | गोष्टीच्या सुरुवातीचा विचार न करता केलेले असंबद्‌ध लिखाण |
| १ | गोष्टीच्या सुरुवातीचा संदर्भ घेऊन वर्णन करण्याचा प्रयत्न. वाक्यरचना नीट नाही त्यामुळे संपूर्ण अर्थबोध नाही. |
| २ | पूर्ण वाक्यांत आणि दिलेल्या शब्दांशी संबंधित पण त्रोटक (एक किंवा दोन वाक्यांत) अभिव्यक्ती. |
| ३ | गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र लिखाणात फारसे नियोजन केलेले नाही. त्यामुळे लेखन विस्कळीत वाटते. |
| ४ | गोष्टीला सुसंगत मध्य आणि शेवट आहे. मात्र एकूण गोष्ट त्रोटक आहे. पात्रे, संवाद, भूमिका यांचा फारसा विचार केलेला नाही. |
| ५ | गोष्टीची सुरुवात लक्षात घेऊन सुसंगत मध्य आणि शेवट आहे. गोष्ट खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/संवाद दिलेले आहेत. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 4/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

**संच : अ**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे. त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**अक्षय सुटीत आईबरोबर मामाकडे गेला. मामाच्या घरासमोरच गावातील शाळा होती. सुटी असूनही गावातली झाडून सारी मुलं शाळेच्या विस्तीर्ण पटांगणात खेळायला जमत असत. अक्षयही मामाच्या मुलासोबत त्यांच्यात खेळायला गेला. भर दुपारी मुलं लगोरी खेळत होती. शाळेच्या बाजूलाच एक रसवंतीगृह होते. ते पाहून अक्षय म्हणाला, ''अरे वा रस!'' खेळून झाल्यावर दोघेही रसाच्या दुकानात गेले. अक्षयने एका दमात रसाचा ग्लास संपवला. रसाचे पैसे दिले आणि दोघेही घरी परतले.**



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 4/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

# संच : अ

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न २) अक्षय खेळायला कोणासोबत गेला?** | (१) | (ब) |

अ) मामासोबात.

ब) मामाच्या मुलासोबत.

क) शाळेतील मुलांसोबत.

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न ३) अक्षय कोणत्या सुटीत मामाकडे गेला असेल?** | (२) | (अ) |

अ) उन्हाळ्याच्या सुटीत.

ब) दिवाळीच्या सुटीत.

क) नाताळच्या सुटीत.

**तोंडी प्रश्न ४) अक्षयला उसाचा रस आवडला होता का?**
**तुला हे कशावरून कळले?** (२)

(होय, ''अरे वा रस!'' या अक्षयच्या वाक्यावरून कळले किंवा अक्षयने एका दमात रसाचा ग्लास संपवला या वाक्यावरून.)

■■■



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 4/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*